action edn 111


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**MCAER**
कृषि परिषद

**ई-मेल :** edn_mcaer@rediffmail.com **संकेतस्थळ :** www.mcaer.org **दूरध्वनी (०२०) २५५२८६८८**


वाचाः-१. कृषी परिषद कार्यालाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि.११/२/२०१६

२. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.९१६/५६८, दि.१८/३/२०१६

३. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५५१२/८५०, दि.२०/४/२०१६

४. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/१०८०, दि.९/५/२०१६

५. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/११८०, दि.२०/५/२०१६

६. कृषी परिषद कार्यालयाचे शुध्दीपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३९१५/८९०, दि.१३/४/२०१७

७. कृषी परिषदेच्या दि. २९/५/२०२३ रोजीच्या ११० व्या बैठकीतील ठराव क्र.१४/११०/दि.२९/०५/२०२३

८. कृषी परिषदेचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१७२३/१६९०/२०२३ दि. २२/०६/२०२३

९. कृषी परिषदेच्या दि. १३/०७/२०२३ रोजीच्या १११ व्या बैठकीमधील विषय क्र.१ अन्वये ठराव क्र.१४/११०/दि.२९/०५/२०२३ मध्ये केलेली सुधारणा.

---

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१७२३/९५८ /२९९२ दि.०९ ऑगस्ट,२०२३

## प रि प त्र क

**विषयः- नवीन विना अनुदान तत्वावरील कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसाठी द्यावयाच्या अर्जाच्या प्रस्तावाची छाननी, नवीन तुकडीवाढ व महाविद्यालयाचे रूपांतर इत्यादीबाबतची शुल्क व नवीन पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राथमिक कार्यपध्दती व निकष निश्चितीबाबत.**

कृषी व संलग्न विद्याशाखेचे कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील पदवी महाविद्यालय एका विद्याशाखेतून दुसऱ्या विद्याशाखेमध्ये रूपांतरित करण्यासाठी कृषी परिषदेच्या दि.२७/३/२००८ रोजीच्या ७५ व्या बैठकीतील ठराव क्र.१९/७५/२००८ अन्वये निकष तयार करण्यात आलेले आहेत. कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांच्या मान्यतेसंदर्भात प्रस्तावांची छाननी करणे, प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्यास त्या त्रुटी पूर्ततेविषयक कार्यवाही करणे, नवीन महाविद्यालयांना परवानगी देणे, तुकडीवाढ विषयक शुल्क निश्चित करणे इत्यादी अनेकविध प्रक्रियेकरिता कृषी परिषद कार्यालयाकडून विविध परिपत्रकांन्वये कार्यपध्दती, निकष व शुल्क निश्चित करण्यात आलेले आहेत.

action edn 111

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या आहे तसेच विना अनुदानित महाविद्यालयांना मान्यता देणे व तुकडीवाढ देणेसंदर्भात मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी सूचना दिलेल्या आहेत. यास अनुसरून सर्वसमावेशक सूचना निर्गमित होणे गरजेचे होते. यास कृषी परिषदेच्या ११० व्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

यास्तव नवीन विना अनुदान तत्वावरील कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसाठी द्यावयाच्या अर्जाच्या प्रस्तावाची छाननी, नवीन तुकडीवाढ व महाविद्यालयाचे रूपांतर इत्यादीबाबतची शुल्क व नवीन पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राथमिक कार्यपध्दती व निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**नवीन महाविद्यालयासाठी निकष-**

(१) ज्या संस्थेचे कृषी किंवा संलग्न महाविद्यालये अस्तित्वात आहेत, अशा संस्थेस इतर विद्याशाखेचे कायमस्वरूपी विना अनुदानित नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे असल्यास अस्तित्वात असलेली सर्व महाविद्यालये 'अ' किंवा 'ब' दर्जाची असावीत.

(२) एका संस्थेस एकाच ठिकाणी एकाच विद्या शाखेतील एका महाविद्यालयांपेक्षा जास्त महाविद्यालये मान्य करण्यात येणार नाही.

(३) ज्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या विद्याशाखेचे महाविद्यालय प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. च्या परिसरामध्ये नसावे. (याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला ग्राह्य असेल.)

(४) भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.६/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

**नवीन महाविद्यालयासाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती-**

१) संस्थेचा कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या प्रस्तावासाठी अर्ज व माहिती पुस्तिका मागण्याकरिता अर्ज कृषी परिषदेस प्राप्त झाल्यानंतर संस्थेकडून (i) जमीन संस्थेच्या नावावर असल्याचे ७/१२ उतारे, (ii) प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. च्या परिसरामध्ये त्या विद्याशाखेचे महाविद्यालय नसल्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला, (iii) संस्थेचे मागील तीन वर्षातील लेखा परीक्षण अहवाल या बाबींची छाननी व पडताळणी करण्यात येईल. याकरिता रु.५.०० लाख शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क संस्थेने धनाकर्षाद्वारे वित्तीय सल्लागार, कृषी परिषद यांचेकडे जमा करावे. सदर बाबींची पूर्तता होत असल्यास मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांच्या मान्यतेने नवीन महाविद्यालयाचा विहित

अर्ज व माहिती पुस्तिका संस्थेस उपलब्ध करून देण्यात येईल. त्याकरिता रू.५०००/- इतके शुल्क आकारण्यात येईल.

२) तथापि, नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी छाननी व पडताळणी झाल्यानंतर संस्था अपात्र ठरत असेल किंवा संस्थेने महाविद्यालय सुरु करण्यास असमर्थता दर्शविली असेल, अशा प्रकरणी संस्थेने कृषि परिषदेकडे जमा केलेले रु. ५.०० लाख प्रक्रिया शुल्क संस्थेस परत करण्यात येईल.

३) नवीन कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या विहित नमुन्यातील प्रस्तावाचे प्रक्रिया शुल्क रू. ८.०० लाख राहील. संस्थेने सदरचे शुल्क वित्तीय सल्लागार, कृषी परिषद यांचेकडे प्रस्तावासोबत धनाकर्षाद्वारे भरावयाचे आहे. कृषी परिषद यापैकी रू. ३.०० लाख संबंधित कृषी विद्यापीठाकडे पाठविल.

४) तथापि, (१) संस्था महाविद्यालय सुरु करण्यास इच्छुक नसेल आणि विद्यापीठाकडून प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्यक्षदर्शी अहवालाबाबत कोणतीही प्रक्रिया झालेली नसेल, अशा प्रकरणी संस्थेने जमा केलेले रु.८.०० लाख प्रक्रिया शुल्काची संपूर्ण रक्कम संस्थेस परत करण्यात येईल. तसेच (२) संबंधित कृषी विद्यापीठाने प्रस्तावित महाविद्यालयास भेट देवून नवीन महाविद्यालयाचा प्रस्ताव नाकारला किंवा कृषी विद्यापीठाच्या तपासणीनंतर संस्थेने महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केल्यास, विद्यापीठाकडे वर्ग केलेले रु.३.०० लाख वगळता कृषी परिषदेकडे जमा असलेली उर्वरीत प्रक्रिया शुल्क रु.५.०० लाख संबंधित संस्थेस परत करण्यात येईल.

५) नवीन महाविद्यालयाबाबत, काही त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर प्रस्ताव मान्य झाला असेल तर त्याप्रकरणामध्ये त्रुटींच्या पूर्ततेच्या अहवालाबरोबर रू.३.०० लाख शुल्क संबंधित संस्थेने कृषी परिषदेकडे जमा करावे. अशाप्रकारच्या त्रुटींची पडताळणी कृषी परिषदेमार्फत करण्यात येईल. एकाच वेळी त्रुटींची पूर्तता झाली नाही तर दुसऱ्या वेळेस आणि त्यानंतरच्या प्रत्येक वेळेस रू.३.०० लाख शुल्क संस्थेस कृषी परिषदेकडे जमा करावे लागेल.

६) नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयास परवानगी मिळाल्यानंतर महाविद्यालय सुरु करतांना कृषी परिषदेकडे रु.५.०० लाख ठेव (डिपॉझिट) म्हणून रक्कम जमा करावी. तसेच रु.१०.०० लाख रकमेची बँक गॅरंटी संबंधित कृषी विद्यापीठाकडे जमा करावी. याशिवाय संबंधीत नवीन महाविद्यालयासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.

७) खाजगी संस्थांनी प्रयोगशाळा, वसतीगृह इत्यादी अनुषंगिक सोयी-सुविधा पहिल्या वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर सोयी-सुविधांची पूर्तता झाल्याचा कृषी विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील शैक्षणिक वर्षात अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. तथापि, संस्थेची प्रगती, आर्थिक स्थिती इत्यादी बाबी विचारात घेऊन काही बाबी क्षमापित / सूट देण्याचे अधिकार मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद / कृषी परिषद यांना देण्यात येत आहेत.

<u>तुकडीवाढचे निकष-</u>

१. चार वर्षे पूर्ण झालेली आणि 'अ' किंवा 'ब' दर्जा प्राप्त महाविद्यालये दुसरी तुकडी मंजूर करण्यास पात्र असतील.

२. कोणत्याही प्रकरणी तिसरी तुकडी मंजूर करण्यात येणार नाही.

३. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.६/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

<u>तुकडीवाढीसाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती-</u>

१. नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयास चार वर्षे पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या तुकडीसाठी मागणी करता येईल. ६० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.८.०० लाख प्रक्रिया शुल्क, ५० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.६.५० लाख प्रक्रिया शुल्क व ४० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.५.०० लाख प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येत आहे. संस्थेने सदरचे शुल्क वित्तीय सल्लागार, कृषी परिषद यांचेकडे प्रस्तावासोबत धनाकर्षाद्वारे भरावयाचे आहे.

२. कृषी परिषद वरील शुल्कापैकी खालीलप्रमाणे रक्कम संबंधित कृषी विद्यापीठाकडे वर्ग करण्यात येईल.

   I) ६० प्रवेश क्षमतेसाठी रु.८.०० लाख पैकी रु. ३.०० लाख.
   II) ५० प्रवेश क्षमतेसाठी रु.६.५० लाख पैकी रु.२.५० लाख.
   III) ४० प्रवेश क्षमतेसाठी रु.५.०० लाख पैकी रु.१.५० लाख.

तथापि, कृषी विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास भेट देऊन प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर महाविद्यालय तुकडीवाढीसाठीचे निकष पूर्ण करीत नसल्याने तुकडीवाढ नाकारल्यास, संस्थेने कृषि परिषदेकडे जमा केलेले प्रक्रिया शुल्क संस्थेस परत करण्यात येणार नाही. मात्र कृषी विद्यापीठाने तपासणी करण्याआधीच संस्थेने तुकडीवाढीचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केल्यास प्रक्रिया शुल्काची संपूर्ण रक्कम संस्थेस परत करण्यात येईल.

३. वाढीव तुकडीसाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांनी कृषी परिषदेकडे शुल्कासह मागणी अर्ज सादर करावा.

४. कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेनंतर कृषी विद्यापीठाकडून याबाबत तपासून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कृषी परिषद तुकडीवाढ मंजुरीबाबत योग्य तो निर्णय घेईल. / कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून मा.मंत्री (कृषी) तथा

अध्यक्ष, कृषी परिषद हे निर्णय घेतील व कृषी परिषदेच्या आगामी बैठकीमध्ये कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**महाविद्यालयाच्या रूपांतराचे निकष-**

१. ज्या विद्याशाखेच्या महाविद्यालयामध्ये रूपांतर करावयाचे आहे, त्या विद्याशाखेचे महाविद्यालय प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. च्या परिसरामध्ये नसावे. (याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला ग्राह्य असेल.)

२. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.६/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

**महाविद्यालयाच्या रूपांतरासाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती-**

(१) सदर संस्थेने संलग्न विद्यापीठाकडे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाची मान्यता रद्द करून रूपांतर करावयाच्या इतर विद्याशाखेमधील महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

(२) स्थानिक तपासणी समितीमार्फत नवीन महाविद्यालयाकरिता निकषानुसार कृषी विद्यापीठाने सदरचा प्रस्ताव विद्या परिषद व विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेस सादर करावा.

(३) विद्या परिषद व कार्यकारी परिषदेची मान्यता मिळाल्यावर कृषी परिषदेकडे मान्यतेसाठी सादर करावा.

(४) सदरचा प्रस्ताव कृषी परिषदेने मंजूर केल्यास रूपांतरापूर्वी अस्तित्वात असलेल्या विना अनुदानित महाविद्यालयाची मान्यता आपोआपच रद्द होईल. मात्र मान्यता रद्द करण्यात आली आहे, असे विद्यापीठाने संबंधित संस्थेस लेखी कळवावे. तसेच सदर महाविद्यालयाची पुढील प्रवेश प्रक्रिया थांबविण्यात आलेली आहे हे सुध्दा विद्यापीठाने कृषी परिषदेला कळवावे. संबंधित मान्यता रद्द केलेल्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करणे त्या महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

(५) विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असेल तर, विद्यापीठाच्या मान्यतेने व विद्यार्थ्यांच्या संमतीने, त्यांचे दुसऱ्या विनाअनुदानित महाविद्यालयात स्थलांतरण करण्याची जबाबदारी मान्यता रद्द केलेल्या महाविद्यालयावर राहील.

(६) महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केल्याशिवाय किंवा त्यांना दुसऱ्या महाविद्यालयात स्थलांतरीत केल्याशिवाय सदर विना अनुदानित महाविद्यालयाची ठेव व बँक गॅरंटी परत करण्यात येऊ नये.

(७) रूपांतरीत नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयास परवानगी मिळाल्यानंतर महाविद्यालय सुरु करतांना कृषी परिषदेकडे रु.८.०० लाख प्रक्रिया शुल्क व रु.५.०० लाख ठेव (डिपॉझिट) म्हणून रक्कम जमा करावी. तसेच रु.१०.०० लाख रकमेची बँक गॅरंटी संबंधित कृषी विद्यापीठाकडे जमा करावी. याशिवाय संबंधीत नवीन महाविद्यालयासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही. सदरची तरतूद यापूर्वी रूपांतराने सुरु झालेल्या महाविद्यालयांनासुध्दा लागू असेल.

(८) प्रक्रिया शुल्काची रक्कम ना परतावा असेल. प्रक्रिया शुल्कापोटी प्राप्त झालेल्या रकमेतून कृषी परिषद रु. ३.०० लाख रक्कम संबंधित कृषी विद्यापीठाकडे वर्ग करेल.

नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालय, तुकडीवाढ व रूपांतर बाबतच्या निकषामध्ये काही विशेष परिस्थितीत विशेष बाब म्हणून काही बाबी क्षमापित / सूट देण्याचे अधिकार मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांना असतील.

नवीन महाविद्यालय आणि तुकडीवाढीची मागणी करणाऱ्या संस्था/महाविद्यालये तसेच राज्यातील कृषी विद्यापीठे यांनी उक्त बाबींची नोंद घ्यावी.

**(रावसाहेब भागडे)**
**महासंचालक**

प्रतः-

(१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, परिपत्रकातील सर्व बाबी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी तसेच सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून कृषी विद्यापीठाच्या सूचना फलक / संकेतस्थळावर सदरचे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात यावे.

(२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.